**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## प्रेसनोट दिनांक - १२/०६/२०२३

### दि.११/०६/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ६२८ /२०२३ भादंवि कलम ३०७, ५०४, ५०६. |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०६/२०२३ रोजी २०/०० वा. ते २३/३० वा. चे दरम्यान. साई चौकाचे पुढे, रेल्वे ब्रिजजवळील चौपाटीचे थोडे पुढे, मोकळे मैदान, पिंपरी, पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/०६/२०२३ रोजी १२/३० वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | संतोष रामकिसन वाल्मिकी वय ४३ वर्षे रा. रुम नं. ६, बिं नं २, अशोकनगर, लिंक रोड, मुकेश ट्रेडर्सचे समोर, पिंपरी, पुणे. **सदर आरोपीस गुंडा विरोधी पथक पिंपरी चिंचवड येथील स्टाफ चौकशीसाठी घेवुन गेले आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादीची आई हिस तीचा पती आरोपी हा तीच्या चारित्र्यावर संशय घेवून तीस शिवीगाळ मारहाण करीत होता. आरोपी याने त्याची पत्नीच्या चारित्रावर संशय घेवून तीला जिवे ठार मारण्याचे उद्देशाने तीला रिक्षात घालून झाडीमध्ये घेवून जावून तेथे कोणतेतरी औषध पाजून, तुला संपवून टाकतो अशी धमकी देवून, दगडाने तीचे डोके ठेचून जखमी केले व ओढणीने तीचा गळा आवळुन जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि डोंब ८४२४९००१२३ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी २७४/२०२३, भा.दं.वि.कलम ३०८,४३५, ४२७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.११/०६/२०२३ रोजी पहाटे ०३/१५ वा.चे सुमा. करण रेसीडेन्सी, विजयराज कॉलनी, ६० फुटी रोड, पिंपळे गुरव पुणे येथील पार्कींग मध्ये व ६० फुटी रोडवर सुवर्ण पार्क, गायकवाड कॉम्पलेक्स समोर,सार्वजनिक रोडवर पुणे येथे |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/०६/२०२३ रोजी १५/३९ वा. |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | निवेश सुरेश केलप्पन वय ३५ वर्षे रा.करण रेसीडेन्सी,बी-११, विजयराज कॉलनी, ६० फुटी रोड,पिंपळे गुरव पुणे **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी याने त्याचेकडील लायटरच्या सहाय्याने कापड पेटवुन दुचाकी वाहनांना आग लावुन सदर आगीमुळे सोसायटीच्या इमारतीमधील फ्लॅटला आग लागुन त्यामधील रहिवाशी असलेल्या लोकांच्या जिवीत व वित्त हानी होवुन शकते याची जाणीव असताना सुध्दा जाणीव पुर्वक तसेच परिसरात दहशत निर्माण करण्याचे उद्देशाने फिर्यादीची दुचाकी तसेच सोसायटमधील इतर सभासदाची दुचाकी वाहने तसेच सार्वजनिक रस्त्याचे कडेला पार्क केलेल्या चारचाकी वाहनाला आग लावुन परिसरामध्ये दहशत निर्माण करुन सदोष मनुष्य वध करण्याचा प्रयत्न करुन फिर्यादी यांची व इतर लोकांच्या वाहनांचे एकुण ४,३०,०००/- रुपयांचे नुकसान केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि खलाटे ९५५२५३३५११ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिखली ३८३ /२०२३ भा.द.वी कलम ३५४अ व बाललैगीक अत्याचार प्रतिबंधक कायदा सन २०१२ चे कलम ७, ८, १२ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.११/०६/२०२३ दुपारी१२/४६ वा सुमा. ॲक्सा एम्पायर सोसायटीचे बिल्डीग मधील गॅलेक्सी मेडीकलच्या दुकानामध्ये देहु आंळदी रोड जाधववाडी चिखली पुणे

गुन्हा दाखल :- दि.११/०६/२०२३ रोजी १८/२३ वा.

फिर्यादी :- महिला फिर्यादी

आरोपी :- समीर शहाबुददीन सलमानी वय २३ वर्ष रा. कुदळवाडी चिखली पुणे
**आरोपी अटक आहे**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची लहान मुलगी ही औषध व दुध आणण्यासाठी गेली असता तिस आरोपी यांने तिचे छातीस व पृष्ठभागाला हात लावुन गैरवर्तन करुन तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सपोनि न्यामणे ९९२३४५५१११

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- म्हाळुंगे एमआयडीसी ३२१/२०२३ भादविकलम ३२४,३२३ ,५०४,३४

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०६/२०२३ रोजी १६/३० वा चे सुमा. खालुंब्रे, ता. खेड, जि. पुणे, येथे कोकाटे वडापावचे टपरीवर

गुन्हा दाखल :- दि. ११/०६/२०२३ रोजी ०१.०५ वा.

फिर्यादी :- अक्षय नागेश जाधव, वय-२८ वर्षे, धंदा-रिक्षाचालक, रा. संत तुकारामनगर येलवाडी ता. खेड, जि. पुणे. मोबाईल नंबर-७७४४०००८२८

आरोपी :- कोकाटे वडापावचे मालक व त्याचे दोन साथीदार नाव पत्ता माहिती नाही.

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे कोकाटे वडापावचे टपरीवर वडापाव, घेण्यासाठी गेले होतो. सदर ठिकाणी फिर्यादी यांनी कोकाटे यांचेकडे पाच वडापावची ऑर्डर देऊन टोकन साठी १००/- रुपये दिले होते. पाच वडापावचे ७५/- रुपये झाले होते. फिर्यादी टोकन घेऊन सदर वडापावचे टपरीवर फिर्यादी लवकर वडापाव दया असे म्हणत असताना सदर कोकाटे वाडापावचे मालकाने फिर्यादी यांना वडापाव दिला नाही. तेव्हा सदर ठिकाणी हजर असलेले मुलाला फिर्यादी यांनी बाजूला केल्याचे कारणावरुन सदर टपरीवरील तीन इसमानी फिर्यादी यांना शिवीगाळ करुन हाताने मारहाण करुन त्यातील एका इसमाने प्लॅस्टीकचे पाईपने डोक्यावर मानेवर व उजव्या हाताचे मनगटावर मारहाण केली म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- पोहवा नवले ९७६४४६९६७२

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- वाकड ५६२ /२०२३ भा.द.वि. कलम ३२४, ३२३,५०४, ३४ महा. पोलीस अधि. कलम ३७(१) सह १३५

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.१०/०६/२०२३ रोजी रात्रौ ११/३० वा. सुमा. अर्शिवाद कॉलनी, रहाटणी, पुणे. याठिकाणी घडला असे

गुन्हा दाखल :- दि. ११/०६/२०२३ रोजी २२/ ०१ वा.

फिर्यादी :- यश राजकुमार कांबळे, वय १८ वर्षे, धंदा शिक्षण, रा. स.नं. ३/१/१ स्वामी समर्थ मंदिराच्या बाजुला, पवनानगर, रहाटणी, पुणे.

आरोपी :- १)विशाल कांबळे वय-२२वर्ष अंदाजे, २)अजय कांबळे वय-२५वर्ष अंदाजे व त्यांचे आणखी दोन साथीदार
**आरोपी अटक नाहि**

तपशिल :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचे मित्र नामे निखिल ओव्हाळ यांस भेटुन त्यांचे मोटारसायकल

वरुन राहते घरी जात असताना फिर्यादी वर नमुद ठिकाणी आले असता तेथे रोडच्या कडेला थांबलेले आरोपी क्र १ व २ यांच्यापैकी आरोपी क्र १ यांने फिर्यादी यांना विनाकारण "ए जाडया गाडी हळु चालव" असे म्हणाला असता त्यावेळी फिर्यादी यांनी त्यास "हळुच चालवित आहे की" असे म्हणाले असता त्यांना त्याचा राग येवुन फिर्यादी यांना वाईट वाईट शिवीगाळ करु लागले त्यावेळी फिर्यादी यांनी त्यांना "शिव्या का देतो" असे म्हणाले असता सदरचे दोन्ही आरोपींनी फिर्यादी यांना हाताने मारहाण करण्यास सुरुवात केली त्यावेळी त्यांना विरोध केला असता ते सदर ठिकाणाहुन पळुन गेले त्यानंतर थोडया वेळाने आरोपी क्र १ व २ व त्यांचे आणखी दोन साथीदार फिर्यादी यांच्या जवळ येवुन त्यांच्यापैकी आरोपी क्र १ याने लाकडी दांडक्याने मारहाण करु लागला व आरोपी क्र २ याने तेथील सिमेंटच्या गट्टुने फिर्यादी यांच्या डोक्यात मारुन जखमी केले व त्यांचे इतर दोन साथीदार हाताने मारहाण करुन निघुन गेले म्हणुन

| | | |
|---|---|---|
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि मणेर ९५४५३४१४६२ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | चाकण ५२६/२०२३ भादवि का क २७९,३३७,४२७ मोटार वाहन कायदा कलम १८४,१३२(अ) प्रमाणे |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१०/०६/२०२३ रोजी १७.३० वाज सुमारास मौजे मोहितेवाडी कालिका हॉटेल समोर ता खेड जि पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/०६/२०२३ रोजी ०१.१९ वा |
| फिर्यादी | :- | अजय दिलीप गाडे वय २३ वर्ष धंदा शेती व्यवसाय. राहणार मुक्काम पोस्ट मोहितेवाडी शेल पिंपळगाव तालुका खेड जिल्हा पुणे |
| आरोपी | :- | ट्रक नंबर एम. एच. १६/सी.सी ९७९८ वरील चालक नाव पत्ता माहीत नाही |
| तपशिल | :- | नमुद केले तारखेस वेळी ठिकाणी यातील फिर्यादी हे त्यांचे ताब्यातील मोटार सायकल नंबर एम.एच.१४/के के १४८९ हिचेसह त्यांचा मित्र शुभम कराळे यास डबल सीट घेऊन मोहितेवाडी येथून बहूळकडे जात असताना फिर्यादी यांचे पाठीमागून येणारा ट्रक नंबर एम.एच.१६/सी.सी९७९८ वरील चालकाने गाडी फिर्यादीचे उजवे बाजूने ओव्हरटेक करीत असताना ट्रकची डावी बाजू फिर्यादी यांचे हिरो होंडा स्प्लेंडर गाडीस ट्रकचे डावी बाजूची धडक दिल्याने फिर्यादी व त्यांचा मित्र रोडवर पडले. त्यामुळे फिर्यादीचे दोन्ही हाताच्या कोप-याला दोन्ही पायांचे गुडघ्यास मार लागून खरचटले आहे व व शुभम कराळे यांचे डाव्या पायाचे गुडघ्यास खरचटलेले आहे .नमुद आरोपी ट्रक चालक अपघात ठिकाणी न थांबता निघून गेला आहे. तसेच फिर्यादी यांचे गाडीचे पुढील शो उजवे बाजस चेंबून, दबून, नुकसान झाले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोहवा गायकवाड ९५५२५३०५६३ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | भोसरी ४९५/२०२३ भा.दं.वि कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.११/०६/२०२३ रोजी १०/०० वा. चे सुमारास दापोडी रेल्वे स्टेशनचे बाहेर तानाजी पुतळया समोर असलेल्या वडा पावच्या हातगाडी जवळ दापोडी पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.११/०३/२०२३ रोजी १४.५४ वा |
| फिर्यादी | :- | शिवाजी दत्तात्रय चव्हाण, वयः- ४२ वर्षे, धंदाः- शेत मजुर, राः- नांदखिलीगार, मु. मुळगार, पो.कानगाव, ता दौड, जि. पुणे फोन नं. ९५२७००८८४८, ९३०९०२९९९३. |
| आरोपी | :- | अज्ञात इसम |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी जात असताना १० रुपयाची नोट खाली पडली म्हणून खाली वाकले असता त्यांचा १५,०००/- रु किं चा एक व्हिवो कंपनीचा मोबाईल फोन खाली पडला असता तो गर्दीमधील कोणीतरी अज्ञात इसमाने हातचलाखीने उचलून चोरुन नेला आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना १४८४ गभाले ९९२२७५५८२३ |

०८.

| | |
|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- पिंपरी ६२९/२०२३ भादंवि कलम ३२४,५०४,५०६,३४,आर्म ॲक्ट ४(२५) महा पो अधि ३७(१)(३)१३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- दि.१०/०६/२०२३ रोजी २३/४० वा सुमा मोरे टी पॉईन्ट या टपरीजवळ वॉशिंग सेंन्टर मोहननगर येते रोडवर |
| गुन्हा दाखल | :- दि.११/०६/२०२३ रोजी १३/५९ वा |
| फिर्यादी | :- सतीश रमेश भडकवाड वय १८ वर्षे व्यवसाय शिक्षण रा महात्माफुले नगर विजय प्रोव्हीजन स्टोअर्स जलळ चिंचवड पुणे |
| आरोपी | :- १)आसिफ वय अं २० वर्षे<br>२)साहिल जानराव वय अं १८ वर्षे पुर्ण नाव माहित नाही रा लालटोपीनगर मोरवाडी पिंपरी पुणे<br>**आरोपी अटक नाहि** |
| तपशिल | :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी आरोपी नं ०२ याने फिर्यादीचा मित्र साक्षीदार नामे तक्षक चंद्रकांत बोराडे रा मोहनगर चिंचवड पुणे यास फोन करुन बोलविल्याने सदर ठिकाणी साक्षीदार तक्षक असे गेले असता यातील आरोपी नं ०१ याने साक्षीदार तक्षक बोराडे यास तुझी मैत्रिन हिला समजावुन सांग ति माझी मैत्रिन माझे सोबत राहु नको असे सांगत असते असे म्हणाला व साक्षीदार तक्षक बोराडे यास शिवीगाळ दमदाटी केली फिर्यादी हे भांडण सोडवित असताना यातील आरोपी नं ०१ व ०२ यांनी फिर्यादी व साक्षीदार तक्षक यांना शिवीगाळ करुन दमदाटी करुन त्यांचे जवळ असलेल्या लोखंडी कोयत्याने डावे डोक्याचे वर कपाळावर व डावे हातावर मारहान करुन फिर्यादीस जखमी केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- पोहवा मुंढे ९३७०१८७१२९ |

०९.

| | |
|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- पिंपरी ६३१ /२०२३ भादंवि कलम ३२४,३२३,५०४,३४ भारतीय हत्यार कायदा ४ (२५), (२७) महा.पो. अधिनियम ३७(१)(३)सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- दि.१०/०६/२०२३ रोजी रात्रौ ११/१५ वा. ते रात्रौ११/३० वा. चे दरम्यान जय भवानी चौक, दत्तनगर, चिंचवड, पुणे ४११०१९ |
| गुन्हा दाखल | :- दि.११/०६/२०२३ रोजी २३/१९ वा. |
| फिर्यादी | :- अल्पवयीन मुलगा |
| आरोपी | :- १)सतिश रमेश भडकवार वय आंदाजे १८ वर्षे रा. विजय प्रोव्हिजन स्टेअर्स, महात्मा फुलेनगर, चिंचवड, पुणे<br>२)चिकु व इतर दोन साथीदार पुर्ण नावपत्ता माहित नाही<br>**आरोपी अटक नाहि** |
| तपशिल | :- नमुद तारिख वेळी व ठिकाणी फिर्यादी त्यांचे मित्र तक्षक यास मोहननगर येथे भेटण्यासाठी त्याच्या मित्राचे गाडीवरुन जात असताना जय भवानी चौक, दत्तनगर, चिंचवड, पुणे येथे फिर्यादीचा दुसरा मित्र तुषार दिसल्याने गाडी थांबवुन त्याचे सोबत बोलत असताना दुसरा मित्र तक्षक हा तिथे आला. तेव्हा फिर्यादी व दोन मित्र तिघे बोलत असताना तक्षकचा मित्र आरोपी क्र १ व २ व इतर दोन साथीदार सदर ठिकाणी येवुन फिर्यादीला काही एक कारण नसताना आरोपी क्र १ याने शिवीगाळ करुन हाताने कानाखाली चापट मारली व आरोपी क्र २ याने पाठिमागुन कोयता काढुन फिर्यादीच्या डोक्यात मारुन फिर्यादीस जखमी केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- पोहवा चाघुले ९५९४३३३३७१ |